# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:30.07.2025** **वार: बुधवार**

---

1. ऑपरेशन सिंदूर देशाच्या एकजुटीचं, सरकारच्या इच्छाशक्तीचं आणि सैन्याच्या सामर्थ्याचं प्रतिक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं लोकसभेत प्रतिपादन
2. पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना ऑपरेशन महादेवमधून लष्करानं ठार केल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती
3. लष्करी कारवाईला स्थगिती देऊन सरकार इतर देशांच्या दबावाला बळी पडलं-विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची लोकसभेत टीका
4. राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबवण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय आणि
5. ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि द फडणीस यांच्या शंभरीनिमित्त पुण्यात त्यांचा हृद्य नागरी सत्कार

**<u>ऑपरेशन सिंदूर</u>**

ऑपरेशन सिंदूर हे देशाच्या एकजुटीचं, सरकारच्या इच्छाशक्तीचं आणि सैन्याच्या सामर्थ्याचं प्रतिक आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकसभेत केलं; ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेला उत्तर देताना ते म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरला जगभरातून पाठिंबाच मिळाला आणि कारवाईला स्थगिती कोणाच्याही दबावाखाली दिली नाही. या कारवाईसाठी सैन्यदलाला पूर्ण स्वातंत्र्य दिलं होतं, असं सांगताना मोदी म्हणाले.....

**सेना को कार्यवाही की खुली छूट दे दी गई और यह भी कहा गया कि सेना तय करें, कब, कहां, कैसे, किस प्रकार से? यह सारी बातें उस मीटिंग में साफ-साफ कह दी गई और कुछ बातें उसमें से मीडिया में शायद रिपोर्ट भी हुई हैं। हमें गर्व है, आतंकियों को वह सजा दी और सजा ऐसी है कि आज भी आतंक के उन आकाओं की नींद उड़ी हुई है।**

पाकिस्तानची कुठलीही आगळीक आपण खपवून घेणार नाही, असा सज्जड इशारा पंतप्रधानांनी दिला. तत्पूर्वी, ऑपरेशन सिंदूरची सविस्तर माहिती देतांना गृहमंत्री अमित शहा यांनी सैन्यदलावर अविश्वास दाखवल्याबद्दल विरोधकांवर जोरदार टीका केली.

भारताच्या सशस्त्र दलांनी एकीकडे ऑपरेशन सिंदूरद्वारे दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना जमीनदोस्त केलं, तर दुसरीकडे पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांना लष्कर आणि सशस्त्र दलांनी ऑपरेशन महादेवद्वारे संपवलं, असं अमित शहा यांनी लोकसभेत सांगितलं. ठार केलेले तीन दहशतवादी लष्कर ए तैयबाचे कमांडर होते आणि ते पहलगाम हल्ल्यात सामील असल्याचे ठोस पुरावे तपास यंत्रणांकडे असल्याचा दावा शहा यांनी केला.

पाकिस्तानच्या लष्करी तळावर हल्ला करू नका असं सांगून सरकारनं राजकीय इच्छाशक्तिचा अभाव दाखवला, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या चर्चेदरम्यान केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आपण कायम सरकारबरोबरच होतो, मात्र कारवाईला स्थगिती देऊन सरकार इतर देशांच्या दबावाला बळी पडल्याची टीका त्यांनी सरकारवर केली. कॉंग्रेसच्या प्रियांका गांधी, समाजवादी पार्टीच्या अखिलेश यादव यांच्यासह विविध खासदारांनी या चर्चेत भाग घेतला.

राज्यसभेतही काल ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेला सुरुवात झाली, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतानं दहशतवाद्यांबद्दलचं कठोर धोरण जगाला दाखवून दिल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी राज्यसभेत सांगितलं. पहलगाम हल्ला सुरक्षा व्यवस्थेतल्या त्रुटीमुळे झाला, याची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्र्यांनी घ्यायला हवी, अशी टीका राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

राज्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबवण्यात येणार असून उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचा निर्णय काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. ग्राम विकास विभागाच्या वतीनं हे अभियान राबवण्यात येईल; यात विविध श्रेणीत 1 हजार 902 पुरस्कार देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अंतर्गत 10 जिल्ह्यात जिल्हा विक्री केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातल्या महिलांच्या बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी हा उपक्रम राबवला जाईल.

'ई-नाम' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन अधिनियम, 1963 मध्ये सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशिम इथं विशेष न्यायालयं स्थापन करण्यात येणार असून पिंपरी-चिंचवडमध्ये जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय तसंच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अशा दोन न्यायालयांची स्थापना करण्यात येणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक विजेत्या ग्रँण्डमास्टर दिव्या देशमुखच्या अभिनंदनाचा ठराव एकमतानं मंजूर करण्यात आला.

**कानबाई-नंदुरबार**

खानदेशाचं आराध्य दैवत कानबाई मातेचा विसर्जन सोहळा नंदुरबार, धुळे आणि जळगावच्या काही भागात नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. कानबाईच्या या अनोख्या उत्सवाची माहिती ऐकुया धुळ्यातल्या खानदेश साहित्य संघाचे अध्यक्ष डॉक्टर सदाशिव सुर्यवंशी यांच्याकडून...

**खानदेशात धुळे जळगाव नंदुरबार जिल्हा व नाशिकचा काही भाग त्या त्या ठिकाणी कानबाई मातेचा उत्सव साजरा करण्यात येतो. खानदेशाच्या नावाची संशोधनात्मक पद्धतीने जी मांडणी करण्यात येते त्यामध्ये कानबाईचा देश म्हणून खानदेश असा उल्लेख केला जातो. श्रावण महिन्याच्या शुक्ल पक्षातील नागपंचमी नंतर किंवा पहिल्या शनिवारपासून कानबाई मातेच्या महोत्सवाला सुरुवात होते. खऱ्या अर्थानं कुटुंबाच्या पुनर्बांधणीचा एकत्र येण्याचा हा सण असतो म्हणून असं म्हंटलं जातं. की लोक दैवत एकीना गाव शिवनी कमाई भक्तिभावन ठिकाण माय कन्हेर कानबाई पुरणपोळीचं गोडधोळ जेवण बनवून नैवेद्य अर्पण केला जातो. रात्री जागरण केलं जातं तर तिसऱ्या दिवशी सकाळी कानबाई मातेचं विसर्जन गावाच्या पांढरीतील जलाशयापर्यंत जाऊन कानबाई उतर आणि वाहे नदी दोन्ही थळी आणि दोन्ही थळी जशी नदी वाहते तशी भरलेल्या डोळ्यातन एक भक्तिभावाने कानबाई मातेसह निरोप देतात.**

**नागपंचमी-सांगली**

नागपंचमीच्या सणानिमित्त राज्यातल्या विविध नाग मंदिरात काल भाविकांनी गर्दी केली होती. सांगली जिल्ह्यातल्या शिराळा इथं काल नागपंचमी यात्रा मोठ्या उत्साहात पार पाडली. यावेळी नागाच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात आली. सर्प संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सर्प मित्रांनी विषारी आणि बिनविषारी सापाविषयी माहिती दिली तसंच साप चावल्यानंतर घ्यायच्या काळजीबद्दल लोकांमध्ये प्रबोधन केलं.

**व्याघ्रदिन-सांगली,भंडारा**

व्याघ्र संवर्धनात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी नवीन धोरण आखण्यात येईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केलं. महाराष्ट्र वन विभाग आणि एशियाटिक बिग कॅट सोसायटीनं जागतिक व्याघ्र दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. वन विभागानं तयार केलेल्या 'वाईल्ड ताडोबा' या माहितीपटाच्या ट्रेलरचं अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. वन्यजीव संवर्धन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणारे चित्रपट निर्माते सुब्बिया नल्लामुथु यांना फडणवीस यांच्या हस्ते एशियाटिक बिग कॅट सोसायटी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जागतिक व्याघ्रदिन काल राज्यात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. सांगली जिल्ह्यात सह्याद्री राखीव व्याघ्र प्रकल्प चांदोली आणि गांधी सेवाधाम विद्यालय आरळा यांनी चांदोली राष्ट्रीय उद्यान परिसरात वृक्षारोपण केलं. भंडाऱ्यात नवेगाव- नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र वनविभागाकडून व्याघ्र संवर्धन तसंच व्याघ्र पर्यटन याविषयी कर्मचाऱ्यांना आणि जंगलालगतच्या गावातल्या वन समित्यांना माहिती देण्यात आली. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**शिद**

शि द फडणीस यांचं व्यक्तिमत्व निरंकारी व्याख्येत चपखल बसतं, असं मत मूर्तिशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांनी काल वयाची शंभरी पूर्ण केली; या निमित्तानं पुण्यात त्यांचा हृद्य नागरी सत्कार करण्यात आला; त्यावेळी देगलूरकर बोलत होते. या सोहळ्यात 'हसरी सेंच्युरी' या दृकश्राव्य कार्यक्रमातून शि. द. फडणीस यांचा जीवनपट

उलगडून दाखवण्यात आला. 'शिदं'च्या शतकी वाटचालीनिमित्त वसुंधरा क्लब आणि कार्टूनिस्ट्स कम्बाइननं 'शि.द.100' हा तीन दिवसांचा महोत्सव आयोजित केला होता.

**पवार- वाहतूक कोंडी**

पुणे आणि परिसरातली वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी या भागातून जाणाऱ्या तीन राष्ट्रीय महामार्गांचं तातडीनं रुंदीकरण करण्यात यावं, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून केली आहे. नाशिक फाटा ते खेड, हडपसर ते यवत आणि तळेगाव-चाकण-शिक्रापूर या रस्त्यांवर सतत वाहतूक कोंडी होत असून वाहनचालकांच्या सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले आहेत, असं पवार यांनी म्हटलं आहे.

**पाऊस**

गोंदिया जिल्ह्यातलं शिरपूर धरण पूर्ण भरलं असून धरणाचे 3 दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने बाघ नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज पावसाच्या सरी पडण्याचा अंदाज असून मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**